# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## नायलॉन मांजाच्या वापरासंबंधी नागपूर मेट्रो तर्फे जनजागृती




नागपूर: महा मेट्रोच्या नागपूर मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत ऑरेंज लाईन मेट्रो स्टेशन आणि पुढे मिहान डेपो पर्यंत तसेच ऍक्वा लाईन मार्गावर सिताबर्डी इंटरचेंज ते लोकमान्य नगर आणि पुढे हिंगणा डेपो पर्यंत मेट्रो ट्रेनचे संचालन सुरु असते. मेट्रो ट्रेनचे संचालन २५००० वोल्ट विद्युत प्रवाहाच्या माध्यमाने होतो. ट्रेनच्या संचालनाकरिता विद्युत प्रवाह होतो व पतंग किवा मांजा या विद्युत तारांमध्ये अडकल्याने दुर्घटना घडू शकते. संक्रांत जवळ आल्याने शहरात पतंग उडवण्याचे प्रमाण वाढणार असून यातुन उद्भवणाऱ्या प्रश्नांबद्दल नागपूर मेट्रो सर्वसामान्य जनतेला सचेत करण्याचा प्रयत्न करीत आहे.

नायलॉन मांजाच्या वापरामुळे रस्त्याने जाणाऱ्या सर्व सामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात धोका होण्याची शक्यता आहे. आजवर, अनेक नागपूरकरांना यामुळे इजा झाली आहे, तर काहींचे प्राण देखील गेले आहेत. नायलॉन मांजाचा वापरामुळे किंवा मेट्रो मार्गिकेच्या जवळ पतंग उडवल्याने त्याचा परिणाम मेट्रो संचालनावर होण्याची आशंका आहे. पतंगीचा मांजा किंवा पतंग मेट्रोच्या ओव्हर हेड तारांमध्ये फसल्याने मेट्रोच्या फेऱ्यांवर विपरीत परिणाम या आधी झाला आहे.

या बाबींसंबंधी सर्वसामान्य नागरिकांमध्ये जन जागृती निर्माण करण्याकरिता महा मेट्रो नागपूर आणि दिल्ली पब्लिक स्कुल (DPS) मिहान यांनी संयुक्त रित्या पथनाट्याचे आयोजन केले होते. नागपूर मेट्रोच्या एयर पोर्ट आणि सीताबर्डी इंटरचेंज मेट्रो स्थानकांवर दिल्ली पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी मेट्रो अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सोबतीने हे पथ नाट्य आयोजित केले. नायलॉन मांजाच्या वापरामुळे होणाऱ्या संभाव्य धोक्यासंबंधी या अंतर्गत जागृत करण्यात आले.

या शिवाय नागपूर मेट्रोच्या कर्मचाऱ्यांना रस्त्यावरून प्रवास करताना नायलॉन मांजामुळे कुठलाही धोका उत्पन्न होऊ नये म्हणून महा मेट्रो नागपूर आणि ट्रॉ फाउंडेशन, त्रिमूर्ती नगर यांच्या संयुक्त विद्यमाने एक विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत दुचाकी वाहनांच्या हँडलवर सुरक्षात्मक तार (सेफ्टी स्ट्रिंग) मोफत बसविण्यात अली त्यामुळे नायलॉन मांजामुळे होणारी इजा टाळता येते. मेट्रो भवन येतेच हा उपक्रम राबवण्यात आला. नागपूर मेट्रो च्या कर्मचाऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

मेट्रो रेल मार्गाजवळ पतंगबाजी केल्याने मांजा ओव्हर हेड इक्विपेन्ट मध्ये फसून मेट्रो ट्रेन चे संचालन प्रभावित होऊ शकते. या सर्व बाबींचा विचार करत सर्व नागरिकांना अनुरोध केला जातो कि त्यांनी न केवळ मेट्रो रेल मार्गाजवळ पतंगबाजी करू नये पण सोबतच नायलॉन मांजाचा वापर देखील टाळावा..